नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६५/२०१८

(रुबेन पिंटो – वादी वि. पांडुरंग नाईक व. –प्रतिवादी)

## :– नि. २० खालील आदेश –:

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी नं.६ विजया चिंतामण नाईक ही दिनांक २३/०९/२०१९ रोजी मयत झाली असून तिला प्रतिवादी नं.१ तसेच अर्जात नमुद प्रतिवादी नं.६अ–श्री. रविंद्र उर्फ बंडया चिंतामण नाईक, ६ब– श्री. प्रविण चिंतामण नाईक, प्रतिवादी नं.६क– श्रीमती मालती रविंद्र किर व प्रतिवादी नं. ६ड– श्रीमती जयश्री निलकंठ सावंत हे कायदेशीर वारस आहेत. तरी प्रतिवादी नं.६ चे नांवपुढे 'मयत' असे नमुद करुन त्यांचे वारसांची दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

२. प्रतिवादी यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज कायदेशीर नसल्याने तो नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा आज्ञार्थी व कायम ताकीद आदेशासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी नं.६ या मयत झाल्याने त्यांचे वारस म्हणून प्रतिवादी नं.१ तसेच प्रतिवादी नं.६अ ते ६ड हे त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी आहेत व ते दाव्यातील आवश्यक पक्षकार आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ अन्वये *''दाव्यातील वादी किंवा प्रतिवादी मृत्यू पावल्यास आणि दावा दाखल करण्याचा अधिकार टिकून राहिल्यास अशा वादी किंवा प्रतिवादीच्या कायदेशीर प्रतिनिधीस दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेतले जाते.''*

४. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी नं.६ या दिनांक २३/०९/२०१९ रोजी मयत झाल्या आहेत. प्रस्तुतचा दावा, आज्ञार्थी व कायम ताकीद आदेशासाठी दाखल केला असल्याने प्रतिवादी नं.६ चे वारस हे देखील दाव्यातील आवश्यक पक्षकार आहेत. प्रतिवादी क्र.१ चे नांव यापूर्वीच दाव्यात समाविष्ट आहे. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादी नं.६ चे इतर वारसांना

दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब नि. १८ कडील अर्जावरील आदेशान्वये माफ करण्यात आलेला आहे. तसेच प्रतिवादी नं.६ विरुध्द 'दावा उपशमित' झालेबाबतचा आदेश नि. १९ कडील आदेशान्वये रद्द करण्यात आला आहे. सबब सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. नि. २० कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. वादी यांना मयत प्रतिवादी नं.६ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर दाखल करण्यास व अर्जातील मागणीप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. वादी यांनी सदर आदेशाच्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर सामील करावी.

सही/–

दिनांक– २८/१०/२०२१

(अ. जो. बाचुलकर)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.